## थोडक्यात बातम्या

# चारठाण्यात अखेर पावसाचे आगमन; शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण



**अक्षराज अलीम शेख**

**दि.२९ चारठाणा (परभणी) :** गेल्या अनेक दिवसांपासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या चारठाणा व परिसरातील नागरिकांना अखेर दिलासा मिळाला. पेरणीनंतर तब्बल १० ते १५ दिवस पावसाने दडी म ारल्यामुळे शेतकरी चिंतेत होते. मात्र मंगळवारी सायंकाळी झालेल्या दमदार पावसामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदा शेतकऱ्यांनी वेळेत खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली होती. मात्र त्यानंतर पावसाने अचानक पाठ फिरवल्याने पिकांच्या उगवणीवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली होती. काही ठिकाणी दुबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली होती. अधूनमधून हलक्या स्वरूपाच्या सरी पडत असल्या तरी त्या शेतीसाठी अपुऱ्या ठरत होत्या.

अखेर आज झालेल्या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. शेतात पिकांना आवश्यक ओलावा मिळाल्याने खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पावसामुळे उकाड्यापासूनही नागरिकांना दिलासा मिळाला असून, गावात सर्वत्र समाधान आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

आता पुढील काही दिवसही पावसाची अशीच साथ मिळावी, जेणेकरून खरीप पिकांचे उत्पादन चांगले होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# भाजप तालुका महिला अध्यक्षा वैशाली बोलमवार यांचा समाजोपयोगी उपक्रम



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.२९, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** भारतीय जनता पक्षाच्या तालुका महिला अध्यक्षा वैशालीताई बोलमवार यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वाढदिवसाचे औचित्य साधून विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास नगराध्यक्षा सुलभाताई पिपरे,सुप्रियाताई नारनवरे, वर्षा वारजूरकर, अर्चना मडावी, सीमा शिडाम, वीणा कुडमेते, माजी नगरसेवक मोहन चलाक, डॉ.एन.जी.नेताम, पुरुषोत्तम शिडाम, डॉ.अनिल नीलमवार, वसंतराव कोतपल्लीवार, ललिता कोतपल्लीवार, अनिलजी.बो लमवार, वैभव वासेकर, वैभव बोलमवार, डॉ.गौरव नै ताम यांच्यासह भाजपच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्ते, मातृशक्ती तसेच वार्ड क्रमांक ४ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी वृक्षारोपण ही काळाची गरज असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे जतन करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिल्याबद्दल उपस्थितांनी वैशालीताई बो लमवार यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# वलनी कॉलनी बौद्ध विहारातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मूर्ती व तांब्याचा कलशची चोरी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील वलनीयेथील वेकोलीच्या कॉलनीतील धम्मक्रांती बौद्ध विहारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दोन किलो वजनाची पितळी मूर्ती व तांब्याचा कलश अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार २४ जुलै २०२६ च्या सायंकाळी ६ वाजेपासून ते २६ जुलै २०२६ च्या दुपारी १:३० वाजेच्या सुमारास ही चोरीची घटना घडली असल्याचा अंदाज धम्मक्रांती बौद्ध विहार वलनी कमिटीने व्यक्त केला आहे. धम्मक्रांती बौद्ध विहारात गौतम बुद्ध यांच्या मूर्तीशेजारी ठेवलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सुमारे एक फूट उंच पितळेची मूर्ती अंदाजे किंमत १५ हजार रुपये व दोन लिटर क्षमतेचा तांब्याचा कलश अंदाजे किंमत ३ हजार ५०० रुपये असा एकूण १८ हजार ५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यानी लंपास केला आहे. सदर घटना विहाराची नियमित साफसफाई करत असताना उघडकीस आली. मूर्ती व कलश जागेवर नसल्याचे दिसताच धम्मक्रांती बौद्ध विहाराचे अध्यक्ष सिद्धार्थ दामोदर भिमटे यांनी खापरखेडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून घटनेतील आरोपीचा शोध सुरू केला आहे. विहारासारख्या पवित्र आणि श्रद्धेच्या ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून चोरट्यांचा तात्काळ शोध घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# इयत्ता चौथी, पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत जावळी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९,पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, जावळी येथील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत अर्चितमुंजाळ तर इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत वैकुंठ कदम व अथर्व कदम यांनी घवघवीत यश संपादन करत शिष्यवृत्तीस पात्रता मिळविली आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापिका अर्चना राऊत, सहशिक्षिका नंदा देवरे, शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ तसेच ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले. मुख्याध्यापिका अर्चना राऊत व सहशिक्षिका नंदा देवरे यांनी विद्यार्थ्यांसाठी घेतलेले विशेष परिश्रम, नियोजनबद्ध अध्यापन, नियमित सराव व वेळोवेळी केलेले मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाल्याचे विद्यार्थ्यांच्या पालकांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे जावळी गावाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही या यशातून प्रेरणा मिळणार असल्याची भावना शाळा व्यवस्थापन समितीने व्यक्त केली.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मागणीसाठी साहित्य क्रांती ज्योत पुण्याकडे प्रस्थान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, पुणे :** आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शाहीर, साहित्यिक आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे जनक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना देशाचा सर्वो च्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात यावा, या मागणीसाठी झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या संघटनेच्यावतीने भव्य साहित्यक्रांती ज्योत अभियानाला आज अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मभूमी वाटेगाव तालुका वाळवा जिल्हा सांगली येथून प्रारंभ झाला.

अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई श्रीमती, सावित्रीबाई साठे यांच्या हस्ते साहित्यक्रांती ज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी लहुजी शक्ती संघटनेचे शंकर भाऊ तडाखे हे ही उपस्थित होते.

त्यानंतर ही साहित्य क्रांतीज्योत राष्ट्रीय महामार्गाने पुण्याकडे प्रस्थान करत असून आज सातारा सर्किट हाऊस येथे मुक्काम होणार आहे. दिनांक ३० जुलै रोजी शिरवळ सर्किट हाऊस येथे मुक्काम झाल्या नंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या पूर्वसंध्येला पुण्यात सारसबाग समोर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळ्याच्या आवारात आवारात या क्रांतीसाहित्य ज्योतीचे भव्य स्वागत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.



श्रीपाल सबनीस, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे अध्यक्ष श्री. भगवानराव वैराट, नेस वाडिया महाविद्यालयाच्या प्राचार्य, श्रीमती वृषाली रणधीर प्रा. आसमा शेख, इत्यादींच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शाहीर गव्हाणकर आणि शाहीर अमर शेख यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात मोठी वैचारिक आणि सांस्कृतिक दिशा दिली, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यामध्ये वंचित, कष्टकरी, भटके, कामगार उपेक्षित समाजातील समाजाचे वास्तव, महिला अस्तित्व चळवळ प्रभावीपणे त्यांनी मांडले असून त्यांनी मराठी साहित्याला नवे वैभव प्राप्त करून दिली आहे. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्याबाबत महाराष्ट्र विधानमंडळातील अनेक आमदारांनी, महाराष्ट्र शासन तसेच संसद संसदेतील अनेक खासदारांनी देखील केंद्र शासनाकडे शिफारस करून अधिवेशनात लक्ष वेधले आहे, याशिवाय साहित्य विश्वातील अनेक साहित्यिकांनी तसेच विचारवंत बुद्धिवंतांनी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी देखील सातत्याने मागणी लावून धरलेली आहे

ही मागणी राष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोचवावी यासाठी झोपडपट्टी सुरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांनी अनेक दशकापासून सातत्याने जन आंदोलन उभारलेले आहे. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न बहाल करणे म्हणजे भारतरत्न पुरस्काराचा गौरव होय, अशी संघटनेची भूमिका आहे.

सुमारे ५०० हून अधिक कार्यकर्ते साहित्य क्रांतीज्योत घेऊन राष्ट्रीय महामार्गावरून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न द्या, अशा घोषणांनी जनजागृती करून पुण्याकडे प्रस्थान करत आहे. या अभियानात झोपडपट्टी सुरक्षा दलाचे पदाधिकारी मोहम्मद शेख, राजाभाऊ शिंदे, शिवाजी भिसे, अभिजीत ननावरे, शिवाजी अवघडे, प्रवीण सपकाळ, नितीन वने, शरद केंगार, सुनीता जाधव, सचिन वायदंडे, संजय सकटे, दिलीप कांबळे, अभिजीत सकटे, ऋषिकेश वायदंडे, यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झालेले आहे.

# सोयगावातील रविंद्र जोहरे व प्रियांका जोहरे यांची सोशल मीडियावर दमदार लोकप्रियता

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, सोयगाव (छ. संभाजीनगर) :** नाट्य पंढरी म्हणून ओळख असलेल्या सोयगाव येथील युवा कलाकार रविंद्र एकनाथ जोहरे व प्रियांका जोहरे यांनी आपल्या दर्जे दार कॉमेडी व्हिडिओंच्या माध्यमातून सोशल मीडियावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण जीवन, कौटुंबिक प्रसंग आणि सहजसुंदर विनोद यांचे वास्तववादी सादरीकरण प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले आहे.

स्वामी समर्थ पेट्रोल पंपावर सोयगाव येथे काम करून अत्यंत साधी व आर्थिकदृष्ट्या हलाखीची परिस्थिती असतानाही या दाम्पत्याने कधीही जिद्द सोडली नाही. अनेक अडचणींचा सामना करत त्यांनी आपल्या कलेवर विश्वास ठेवला आणि सातत्याने मेहनत घेत सोशल मीडियावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. आज त्यांचा संघर्ष अनेक होतकरू कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

त्यांच्या सोशल मीडिया प्रवासात इन्स्टाग्रामवर सुमारे १ लाख ६८ हजार, फेसबुकवर ५५ हजार आणि यूट्यूबवर ४ हजार फॉलोअर्सचा टप्पा त्यांनी गाठला आहे. त्यांच्या प्रत्येक नव्या व्हिडिओला हजारो प्रेक्षकांचा



उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मराठवाड्यातील प्रेक्षकांमध्ये त्यांची लोकप्रियता सातत्याने वाढत आहे.

रविंद्र आणि प्रियांका जोहरे यांची जोडी मराठवाड्यातील स्थानिक बोलीभाषा, सामाजिक विषय आणि निरोगी विनोद यामुळे घराघरांत पोहोचत आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून सोयगावच्या कलागुणांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यात या जोडीचे सोयगाव मध्ये असलेल्या अनेक ज्येष्ठ व उदोन्मुक मुख कलाकाराचे योगदान उल्लेखनीय मानले. तसेच समाजभूषण अरुण श्रीराम सोहणी यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांचे सोहानी मल्टी सर्विसेस सोयगाव मध्ये शाल श्रीफळ व फुलगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# E20 ला विरोध म्हणजे पुढची पिढी संपवणे - पाशा पटेल

## जीवाश्म इंधन लॉबीकडून शेतकरी हिताला सुरुंग लावण्याचा कट; इथेनॉलमुळे इंजिन खराब होतं, हा दावा चुकीचा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** E20 इथेनॉल मिश्रित पेट्रोलला विरोध करणे म्हणजे पुढच्या पिढीचे अस्तित्व धोक्यात घालणे आहे. गाड्या खराब होतात असे सांगून शेतकरी व देशाच्या हिताला सुरुंग लावणारी जीवाश्म इंधन आयात करणारी लॉबीच या विरोधामागे आहे, असा घणाघात महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी केला. अहिल्यानगरमध्ये पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, सोशल मीडियावर 'E20 जनता पार्टी' स्थापन झाल्यापासून इथेनॉलविरोध वाढला आहे.



मात्र हा देशहिताचा नसून आयात लॉबीचा कट आहे. होरपळीचे युग थांबवायचे असेल तर जमिनीच्या पोटातले इंधन बंद करून जमि नीच्या पाठीवरचे इंधन वापरावे लागेल, असे सांगून त्यांनी शास्त्रीय आधार दिला. हवेतील कार्बन ३५० PPM पर्यंत सुरक्षित आहे. आज ते ४३० झझच् झाले आहे. एक लिटर पेट्रोलमध्ये ३ किलो कार्बन तयार होतो. मात्र इथेनॉलमध्ये कार्बनचे नैसर्गिक चक्र असते. तापमान कमी न झाल्यास २०३० नंतर धान्य, दूध, मासे उत्पादनात ४० टक्के घट होईल, असा इशारा त्यांनी दिला. E20 मुळे शेतकऱ्यांना ४० हजार कोटींचे अतिरिक्त उत्पन्न, देशाला २०१४-२४ मध्ये १.०६ लाख कोटींची तेल आयात बचत आणि ५४.४ दशलक्ष टन उज२ उत्सर्जन बचत झाली आहे. दुचाकींमध्ये ५०% व चारचाकींमध्ये ३०% कार्बन मोनॉक्साइड घट झाली आहे. १९७७ मध्ये मोहरीच्या तेलाविरोधात ड्रॉप्सीचा खोटा प्रचार करून देशी उद्योग मोडला गेला होता. आज ए२० बद्दलही तसाच आंतरराष्ट्रीय कट आहे, असे ते म्हणाले.

**इंजिन खराब होते हा भ्रम आहे.**

२०२३ नंतरची सर्व वाहने ए२० सुसंगत आहेत, असे स्पष्ट करत पटेल यांनी सरकारकडे पंपावर माहिती, जुन्या वाहनांसाठी कंपनीची योजना आणि अन्नसुरक्षा जपून इथेनॉल निर्मिती, अशा ३ मागण्या केल्या.

# पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून द्या

## रुग्णकल्याण समिती सदस्य तथा भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष मस्के यांचे आ.मुनगंटीवार यांना निवेदन

**अक्षरज : प्रतिनिधी**

**दि.२९, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** पोंभुर्णा तालुक्यातील नागरिकांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार,तात्काळ आणि आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्णकल्याण समितीचे सदस्य तथा भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अजय मस्के यांनी केली आहे. याबाबत त्यांनी बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी मशीनची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील तसेच परिसरातील रुग्णांना सोनोग्राफी तपासणीसाठी चंद्रपूर अथवा इतर दूरच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा वेळ, पैसा आणि शारीरिक त्रास मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विशेषतः गर्भवती महिला, महिला रुग्ण, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर गरजू रुग्णांना याचा मोठा



त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य तपासणीसाठी दूरच्या शहरांमध्ये जाण्याची वेळ येऊ नये, तसेच रुग्णांचे वेळेत निदान होऊन त्यांना योग्य उपचार मिळावेत, यासाठी पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी मशीन उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. ही सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्यास पोंभुर्णा तालुका व परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, रुग्णालयातील आरोग्यसेवाही अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

यापूर्वी ही पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी अजय मस्के यांनी मागणी व पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीची दखल घेत आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी ग्रामीण रुग्णालयासाठी संपूर्ण रक्तपेशी तपासणी (उइउ) मशीन उपलब्ध करून दिली होती. या मशीनमुळे रुग्णांच्या रक्त तपासणीचे अहवाल कमी वेळेत उपलब्ध होऊन डॉक्टरांना रुग्णांचे निदान व पुढील उपचार लवकर करता येत आहेत. त्यामुळे रुग्णांना मोठा फायदा होत असून, ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवेला अधिक गती मिळाली आहे.

त्याच धर्तीवर आता पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी अजय मस्के यांनी केली आहे. सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध झाल्यास गर्भवती महिला तसेच इतर रुग्णांना तपासणीसाठी चंद्रपूर किंवा इतर शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. रुग्णांचे वेळेत निदान होऊन त्यांना तातडीने योग्य उपचार मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

रुग्णकल्याण समितीचे सदस्य म्हणून ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांच्या अडचणी आणि नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन अजय मस्के सातत्याने पाठपुरावा करत आहेत. यापूर्वी संपूर्ण रक्तपेशी तपासणी (उइउ) मशीन उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने आता सोनोग्राफी मशीनची मागणीही ते प्राधान्याने पूर्ण करतील, असा विश्वास अजय मस्के यांनी व्यक्त केला.

आमदार निधीतून अथवा संबंधित शासकीय आरोग्य योजनेंतर्गत पोंभुर्णा ग्रामीण रुग्णालयासाठी सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुधीरभाऊ म ुनगंटीवार यांनी पुढाकार घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. पोंभुर्णा तालुक्यातील नागरिकांना चांगल्या आणि आधुनिक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवरच उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. त्याम ुळे सोनोग्राफी मशीनची मागणी लवकरात लवकर पूर्ण करून तालुक्यातील नागरिक व रुग्णांना दिलासा मिळवून द्यावा, अशी अपेक्षा अजय मस्के यांनी व्यक्त केली आहे.